Reg. No. NP CITY/236/2018-20.

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३०] मंगळवार, नोव्हेंबर ११, २०२५/कार्तिक २०, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा.,अ. क्र. ८५

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक २), यांजकडून

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९(१) खालील अधिसूचना

क्रमांक मं. अ.-उजिभू.क्र.२-कावि-१६१-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित, शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक उजिभू.-मं.अं.-कावि-७३-२०२५, दिनांक २६ जून, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यांत येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक २), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर, यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०२-अ-६५-२०२५-२६, मौजा : कोटगाव, तह. मौदा, जिल्हा नागपूर.

अ.क्र.	जमिन मालकाचे नांव	गट क्रमांक	क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)
			हे. आर
१	मोरेश्वर बरबट खोडके	१५७/२	० ०१
		एकूण . .	० ०१

अनुसूची – दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	गोसीखुर्द प्रकल्प.
प्रकल्प कामाचे विवरण	:-	गोसेखुर्द पुनर्वसन विभागीय पथक नागपूर बुडीत क्षेत्राकरिता भूसंपादन प्रस्ताव.
प्रकल्पाचे समाजाला मिळणारे फायदे	:-	गोसीखुर्द प्रकल्पामुळे सिंचन क्षमता निर्मीतीचे उद्दीष्ट्ये साध्य करण्याकरिता.

अनुसूची - तीन

पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन

संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही –निरंक–

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

(१) मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.एलएसी-कार्या-२५-कावि-११८-२०२५, दिनांक २७ मे, २०२५ .

(२) कार्यकारी अभियंता, गोसेखुर्द पुनर्वसन विभागीय पथक, नागपूर यांचेकडील पत्र क्र. १८३०-चिशा-२-गोपुविम-भूसंपादन प्रस्ताव-कोटगाव-२०२५, दिनांक ८ मे, २०२५ संपादनामुळे भुधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन, अधिनियम, १९८६ व तद्नंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील..

टीप :-उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. २, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

विशाल कुमार मेश्राम,

नागपूर :

दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५.

उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. २,

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.